१) लोकमत पु. पान क्र. २

दि. 08/02/2023

# तुमची सुरक्षा करताना माझा दवाखाना वाढला

## कामाच्या ताणामुळे पोलिसांमध्ये उद्भवतात आजार

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : सध्याच्या जीवनशैलीमुळे बहुतांश पोलिस विविध आजारांच्या विळख्यात सापडत आहेत. काहींना गंभीर आजारांनी घेरले आहे; तर काहींचा मृत्यू झाला आहे.

पोलिस ठाण्यात प्रभारी अधिकारी हे पोलिस कर्मचाऱ्यांच्या समस्या, अडीअडचणी जाणून घेत असतात. त्या स्थानिक किंवा गरज पडल्यास वरिष्ठ पातळीवर सोडवण्याचा प्रयत्न केला जात आहे. पोलिसांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, मानसिक ताणतणावाचे नियोजन करण्यासाठी समुपदेशन, विरंगुळ्याचे उपक्रम आयुक्तालयात राबवले जात आहेत. परंतु ते प्रयत्न अतिशय तुटपुंजे असून ते व्यापक व मोठ्या प्रमाणात होण्याची आवश्यकता आहे.

सध्या मीरा भाईंदर शहराची आजच्या घडीला लोकसंख्या सुमारे १३ लाखांच्या आसपास आहे. तर, वसई-विरार या दोन शहरांची सुमारे २५ लाख अशी मिळून पोलिस आयुक्तालयाची लोकसंख्या सुमारे ३८ लाखांच्या घरात पोहोचली आहे. सध्याची २ हजार २७० पोलिसांची संख्या व सध्याच्या लोकसंख्येचा विचार केल्यास १ हजार ६७५ लोकांमागे एक पोलिस आहे.



### अनेकांची स्वेच्छानिवृत्तीची इच्छा

नवीन ठाणे ग्रामीण अशी विभागणी होऊन पोलिस आयुक्तालय झाले तेव्हादेखील, एका पोलिसाने तब्येतीमुळे स्वेच्छानिवृत्ती मागितली होती. पण त्याला ती मिळाली नाही.

### मीरा भाईंदर - वसई, विरार पोलिस दलाचे मनुष्यबळ किती?

| पदे | मंजूर | रिक्त |
|---|---|---|
| पोलिस आयुक्त | १ | ० |
| अपर पोलिस आयुक्त | १ | ० |
| उपायुक्त | ५ | १ |
| सहायक पोलिस आयुक्त | १३ | ५ |
| पोलिस निरीक्षक | ७३ | ३ |
| सहायक पोलिस निरीक्षक | १०९ | २ |
| पोलिस उपनिरीक्षक | २२४ | ४८ |
| सहायक उपनिरीक्षक | २५४ | ४ |
| पोलिस हवालदार | ८१८ | ८ |
| पोलिस नाईक | ५५ | ०० |
| पोलिस शिपाई | १७७८ | ९९० |
| एकूण | ३३३१ | १०६१ |

### १ हजार ६७५ लोकांमागे १ पोलिस

सन २०२१ ची जनगणना कोरोनामुळे झालेली नसली तरी मीरा भाईंदर शहराची आजच्या घडीला लोकसंख्या सुमारे १३ लाखांच्या आसपास, तर वसई - विरारची सुमारे २५ लाख अशी मिळून पोलिस आयुक्तालयाची लोकसंख्या सुमारे ३८ लाखांच्या घरात आहे. सध्याची २ हजार २७० पोलिसांची संख्या व सध्याच्या लोकसंख्येचा विचार केल्यास १६७५ लोकांमागे १ पोलिस आहे.

परिमंडळ १ - काशीमीरा, मीरा रोड, नयानगर, नवघर, भाईंदर व उत्तन.

परिमंडळ २ - वसई, माणिकपूर, नायगाव, आचोळे, तुळींज, वालिव.

परिमंडळ ३ - विरार, पेल्हार, मांडवी, अर्नाळा, नालासोपारा.



**९८६ जागांसाठी भरती प्रक्रिया**

पोलिस आयुक्तालयात रिक्त असलेल्या तसेच रिक्त होणाऱ्या पोलिस शिपाई पदासाठीच्या ९८६ जागांची भरती सुरू आहे.

त्यात २९७ महिलांचा समावेश आहे; तर पोलिस शिपाई वाहनचालक पदासाठी १० जागांवर भरती प्रक्रिया सुरू असून त्यात दोन महिला असतील.

२) लोकसत्ता पु. पान क्र. १



# वाळू माफियांविरोधात कारवाई

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : मांडवी पोलीस ठाण्याने अवैध वाळू उत्खनन, वाहतूक आणि विक्री विरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे. कारवाईच्या वेळी केवळ गुन्हे दाखल न करता जप्त केलेले वाळू उपशा करण्याचे साहित्य नष्ट करण्यास सुरवात केली आहे. या मोहिमअंतर्गत नुकतीच कसराळी आणि वैतरणा या ठिकाणी वाळू माफियांविरोधत कारवाई करण्यात आली.

वैतरणा रेल्वे ब्रीज परिसरातून अवैध वाळू उत्खनन केल्यामुळे सागर ज्ञानेश्वर पाटील आणि दिलीप काशिनाथ पाटील यांच्यविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वाळू उत्खनन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या बोटी, सक्शन पंप आणि पाईप कापून, तोडून आणि जाळून नष्ट करण्यात आल्या आहेत. वाळू माफियांनी काही ठिकाणी विक्रीकरिता अवैधपणे वाळूचा प्रचंड साठा करून ठेवल्याने त्यांच्यावर महसूल विभागामार्फत दंडात्मक कारवाई देखील करण्यात येत आहे, अशी माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी दिली.

३) लोकमत पु. पान क्र. १

# भाईंदरमध्ये श्रमजीवी संघटनेचे आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर येथील पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालय खासगी संस्थेस चालवण्यास देण्याचा प्रयत्न हाणून पाडू, असा इशारा देत श्रमजीवी संघटनेने राज्य शासनाच्या निषेधार्थ आंदोलनास सुरूवात केली आहे. २० फेब्रुवारीला भीक मागो आंदोलन करून जमलेला पैसा रुग्णालयाकरिता शासनाला दिला जाणार आहे.

श्रमजीवी संघटनेने शासकीय रुग्णालय खासगी संस्थेस देण्यास विरोध केला आहे. पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्षा स्नेहल दुबे - पंडित व कार्याध्यक्ष सुलतान पटेल यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्याची सुरुवात बुधवारी सायंकाळी मीरा गावठाण, महाजनवाडी येथून करण्यात आली. शासनाविरुद्ध घोषणा देत निदर्शने केली.

CamScanner

Scanned with CamScanner

4) पुढारी पान क्र. 3

दि. 08/02/2023

# स्वस्त घराचे स्वप्न दाखवून सामान्यांची फसवणूक

## आरोपीला नालासोपारा पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरारमध्ये स्वस्त घराचे स्वप्न दरात घर देण्याचे स्वप्न दाखवून फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे भासवुन सर्वसामान्य जनतेची फसवणुक करणारा मुख्य आरोपीला गुन्हे शाखेच्या युनिट ३ ने अटक केली आहे.

हॅरेल पॅट्रिक साल्वीन (६९) यांना रामसिंग देवरा, शुभम मिश्रा, सुरंज दुबे, गौतम चौधरी व रूम मालक पुलक दास यांनी आपसांत संगनमत करून या रूम वर DHFL या बँकेचे थकित कर्ज असताना देखील सदर रूमवर कोणत्याही प्रकारचे कर्ज नाही असे भासवून सदरचा रूम रजिस्ट्रेशनद्वारे विक्री करून फिर्यादी यांच्याकडून रूमकरीता एकुण १७ लाख ५० हजार रुपये चेकद्वारे घेवून त्यांना आतापर्यंत रूमचा ताबा न देता तसेच फिर्यादी यांनी रूम करीता दिलेले पैसे परत न करता त्यांची फसवणुक केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.




मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई, विरार परिसरात गेल्या काही महिन्यापासून स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन सर्वसामान्य नागरीकांची आर्थिक फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. त्याअनुषंगाने फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते.सदर फसवणुकीच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी आदेश देण्यात आले होते. पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे, अमोल मांडवे, यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. प्रमोद बडाख, पो.उप निरी. उमेश भागवत, शंकर शिंदे, अशोक पाटील, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, मसुब प्रविण वानखेडे, सागर सोनवणे यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे सापळा रचून गुन्हयातील मुख्य आरोपी रामसिंग जालमसिंग देवरा (२८) याला ताब्यात घेवून चौकशी केली असता स्वस्त दरात घर विकत घेऊ इच्छीणाऱ्या सर्वसामान्य नागरीकांना हेरुन त्यांची ५०,००,००० रुपयांची फसवणुक केले असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून अर्नाळा पोलीस ठाण्यात तीन गुन्हे तर नालासोपारा पोलीस ठाण्यात २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आज त्याला न्यायालयात हजर केले असता त्याचा ताबा अर्नाळा पोलिसांकडे देण्यात आला आहे. पुढील तपास अर्नाळा पोलीस करीत आहेत.

5) पुढारी पु. पान क्र. 1

## मोटारसायकल चोरी करणाऱ्यांना अटक

**मिरारोड :** आचोळे पोलीस ठाणे हद्दीत मोटारसायकल चोरी करणाऱ्या दोघांना व ती चोरीची मोटारसायकल विकत घेणाऱ्या भंगार विक्रेत्याला तसेच टेम्पोचालकाला अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून २ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नालासोपारा पूर्वेला राहणारे भरतकुमार रंगाराम पुरोहित यांनी त्यांची मोटारसायकल ही त्यांच्या घरासमोर उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी केल्याबाबत आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दिवसेंदिवस मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली आहे. त्यानुसार, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून आरोपीची माहिती मिळवली. त्यावेळी पोलीस पथकाने सापळा रचून मोटारसायकल विक्री करण्यासाठी आलेल्या सलाउद्दीन सलिम खान (वय २२), विपिन दिलीप राय (वय २७) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी मोटारसायकल चोरी केल्याचे सांगितले. या आरोपींनी जिशान अहमद इबरार खान (वय २०) या भंगार खरेदी, विक्री करणाऱ्या भंगार विक्रेत्यास विकली असल्याचे सांगितले. त्याला अटक करून त्यांच्याकडून चोरी केलेली मोटारसायकल, टेम्पो असा २ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

6) पुढारी पान क्र. 7

# विमा पॉलिसीच्या नावाखाली ४८ लाखांची फसवणूक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदरमध्ये राहणाऱ्या ग्रॅनाइट व्यापाऱ्यांना तुमच्या पॉलिसीचे लिमिट वाढले असून विमा पॉलिसीचा परतावा देण्याच्या बहाण्याने तीन महिन्यांच्या कालावधीत ४८ लाख रुपयांची फसवणूक केली. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत राहणारे घिसाराम माली यांची फसवणूक झाली आहे. माली यांनी २०१९ मध्ये त्याचे गृहकर्ज सुरक्षित करण्यासाठी ४० लाखांची विमा पॉलिसी घेतली होती. त्याचा दोन वर्ष नियमितपणे प्रीमियम भरला होता. दोन वर्षांपूर्वी कोरोना व लॉकडाऊनमुळे, त्याच्या व्यवसायावर गंभीर परिणाम झाला त्यामुळे त्यांनी २०२१ मध्ये मासिक प्रीमियम भरणे थांबवले. सप्टेंबर २०२२ मध्ये त्यांना एका व्यक्तीचा फोन आला. त्याने एचडी एफ सी लाईफ विमा कंपनीचा व्यवस्थापक असल्याचे सांगितले. त्याने पॉलीसी नंबर सांगून तुमची पॉलीसी बंद झाली आहे. तुम्ही भरलेल्या पैशाचा तुम्हाला परतावा देण्यात येत आहे. १ लाख ३८ हजार रुपये असून ते तुम्हाला पाहिजे असतील तर १२८९० रुपये भरावे लागतील. त्यांचा विश्वास जिंकण्यासाठी गुन्हेगारांनी त्याचे ओळखपत्र आणि चेकचे फोटोही पाठवले. तक्रारदाराने त्यांनी दिलेल्या बँक खात्यात पैसे हस्तांतरित केले. अशा प्रकारे अनेक वेळा तुमच्या पॉलिसीचे लिमिट वाढवले आहे असे सांगून तक्रारदाराकडून हर्षल परमार, डिंपी सतावती, विक्रम चव्हाण, नेहा तसेच रवी चिकना यांनी वेळोवेळी फोन करून सप्टेंबर २०२२ ते २७ जानेवारी २०२३ पर्यंत ४४ व्यवहारांद्वारे एकूण ४७९७५८० रुपये घेतले. हर्षल परमार, डिंपी सतावती, विक्रम चव्हाण, नेहा तसेच रवी चिकना या सायबर गुन्हेगारांविरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदाराने घेतलेल्या विमा पॉलिसीची मॅच्युरिटी ४० लाख रुपये होती. 'सायबर गुन्हेगारांनी सायबर गुन्हेगारांनी त्याची फसवणूक करून त्याच्या पॉलिसीच्या रकमेपेक्षा जास्त फसवणूक केली आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

7) पूण्यनगरी पू. पान क्र. 2

दि. 08/02/2023

# फसवणुकीचे साडेचार लाख रुपये पोलिसांनी दिले परत मिळवून

**मीरा रोड :** क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉइंट वाढवण्याचे आमिष दाखवून साडेचार लाख रुपये फसवणूक झालेली रक्कम सायबर गुन्हे कक्षाने परत मिळवून दिली. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अचोळे पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या दुष्यंत कुमार शर्मा यांना त्यांच्या मोबाईलवर ५०० रिवॉर्ड पॉइंट वाढवण्यासाठी एसएमएस. व एक लिंक आली होती.

त्या लिंकवर शर्मा यांनी क्लिक केल्यानंतर त्यांची क्रेडिट कार्डची माहिती भरली असता त्यांच्या क्रेडिट कार्डमधून साडेचार रुपये लाख काढण्यात आले. त्याबाबत सायबर गुन्हे कक्षाकडे ३ फेब्रुवारी रोजी तक्रार अर्ज करण्यात आला होता.

या तक्रारीबाबत तत्काळ दखल घेऊन तक्रारदारांची फसवणूक झालेली रक्कम रोझर पे या पेमेंट गेटवेद्वारे गेल्याचे दिसल्यामुळे लगेच त्या पेमेंट गेलेल्या कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करून फसवणूक झालेली रक्कम थांबवण्यात आली. तसेच फसवणूक झालेले साडेचार लाख रुपये पुन्हा तक्रारदारांच्या खात्यावर परत मिळवण्यात आले. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना पोलिसांकडून वारंवार याबाबत खबरदारीचे आवाहन करण्यात येते, तरी देखील नागरिक दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे अशा घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे.

8) लोकमत पू. पान क्र. 4

# मीरा रोडमध्ये काँग्रेसचे आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** कोट्यवधी जनतेचे पैसे असलेल्या एलआयसी व स्टेट बँक ऑफ इंडियामधील काही हजार कोटी रुपये अदानीच्या फायद्यासाठी त्यांच्या कंपन्यांत गुंतवून देशाची लूट सरकारने चालवल्याचा आरोप करत काँग्रेसने मीरारोडमध्ये एसबीआयसमोर आंदोलन केले.

मीरारोडच्या शिवार उद्यानसमोर स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा आहे. या शाखेबाहेर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत, महिला अध्यक्षा रूपा पिंटो, युवक काँग्रेस अध्यक्ष सिद्धेश राणे, माजी नगरसेविका मर्लिन डिसा, गीता परदेशी, महेंद्र सिंह, कार्याध्यक्ष फरीद कुरेशी, राकेश राजपुरोहित, एकनाथ पाटील, युवक काँग्रेस दीप काकडे, सोशल मीडिया सचिव यास्मिन खान यांनी आंदोलन केले.

9) म.टा.पू. पान क्र. 1

# पोलिस भरतीला आलेल्या तरुणांना संस्थेचा आधार

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयाकडून राबवल्या जाणाऱ्या भरती प्रक्रियेसाठी भाईंदर मध्ये राज्यभरातून तरुण येत आहेत. येथे विविध गैरसोयींचा सामना तरुणांना करावा लागत होता. आता एका संस्थेकडून येथे अल्प दरात भोजन व्यवस्था व निवासापर्यंत सोडण्याची वाहन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे ही संस्था भरतीला आलेल्या तरुणांसाठी आधार ठरू लागली आहे.

मिरा- भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयातील शिपाई व वाहनचालक पदाच्या रिक्त जागा भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. त्याकरता भाईंदर पश्चिमेच्या नेताजी सुभाष चंद्र बोस मैदानावर मैदानी चाचणी घेतली जात आहे. या ठिकाणी मैदानी चाचणीला दररोज सुमारे एक हजारहून अधिक तरुण हे राज्यभरातून येतात. ह्या तरुणांना राहण्यासाठी पालिकेकडून मैदानापासून काही अंतरावर व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु प्रवासासंदर्भातील माहिती नसल्याने अधिक विद्यार्थी हे रस्त्याच्या कडेलाच रात्र काढत असल्याचे दिसून येत होते.

परिसरात जेवणाची योग्य व्यवस्था नाही. काही ठिकाणी असली तरी मनमानी पद्धतीने पैसे आकारले जात असल्याचे तरुणांकडून बोलले जात होते. परिणामी भरतीला आलेल्या तरुणांची गैरसोय होत होती. ह्या तरुणांच्या मदतीला छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टने मदतीचा हात पुढे केला आहे. या संस्थेने मैदानाच्या परिसरातच अल्प दरात जेवण, चहा व बाटलीबंद पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, यासह नाममात्र शुल्क आकारून मैदानी रात्री मैदानावर पोहोचलेल्या तरुणांना निवास व्यवस्थित पर्यंत पोहचवणे व पहाटे पुन्हा मैदानावर घेऊन येण्याची सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ पवार यांनी हे तरुण येत्या काळात मिरा-भाईंदरकरांच्या सुरक्षेसाठी सेवा देणार आहेत. त्यांना मदतीची गरज असल्याने हे कार्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

10) पूढारी पू. पान क्र. 2

# इन्स्टाग्रामवर अल्पवयीन मुलीचा छळ

**मिरारोड :** काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत एक अज्ञात व्यक्तीकडून इन्स्टाग्रामवर वेगवेगळे अकाऊंट तयार करून अल्पवयीन मुलीला त्रास देत होता. त्या अज्ञात व्यक्तीचा सायबर गुन्हे कक्षाने तपास करून अल्पवयीन मुलीला त्रास देणाऱ्यास अटक केली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील एक अज्ञात व्यक्ती इन्स्टाग्रामवर वेगवेगळे अकाऊंट तयार करून अल्पवयीन मुलीला त्रास देत असल्याबाबत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच या गुन्ह्याचा सायबर गुन्हे कक्षाने तपास सुरू केला. यावेळी इन्स्टाग्राम आयडीची माहिती घेऊन संशयित आरोपीचा मोबाईल क्रमांक मिळवला. त्या मोबाईल क्रमांकावरून सायबर गुन्हे कक्षाने आरोपीला अटक केली आहे. अशा प्रकारच्या घटना पुढे आपल्यासोबत घडू नयेत, यासाठी पोलिसांनी काळजी घेण्यास सांगितले आहे.

11) सकाळ पान क्र. 5

# चार महिन्यानंतर मृत्यूप्रकरणी गुन्हा

नालासोपारा, ता. ७ (बातमीदार) : वसई विरार महापालिकेच्या वसई पूर्व भोयदापाडा परिसरातील डम्पिंग ग्राऊंडमध्ये कचरा वेचणारा एक इसम जखमी होऊन त्याचा मृत्यू झाल्याची घटना चार महिन्यानंतर उघड झाली आहे. शवविच्छेदन अहवालावरून पोकलेन चालकावर वालीव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहम्मद फैज अन्सारी असे मयत कचरा वेचणाऱ्याचे नाव; तर दिलीप मालग्न असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. १२ सप्टेंबर २०२२ रोजी कचरा वेचणारा अन्सारी हा जखमी झाला होता. केईएम रुग्णालयात त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 08/02/2023

12) सकाळ पू. पान क्र. 2

# वसईत काँग्रेसची भाजपविरोधात निदर्शने

## अदाणी समूहाच्या गैरकारभाराची चौकशी करण्याची मागणी

विरार, ता. ७ (बातमीदार) : मोदी सरकारने एलआयसी आणि स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सर्वसामान्य कोट्यवधी गुंतवणूकदार व खातेदारांचे कष्टाचे कोट्यवधी रुपये धोक्यात टाकले आहेत. त्याविरोधात काँग्रेस पक्षाने संसदेमध्ये आवाज उठवला. अदाणी समूहाच्या गैरकारभाराची चौकशी व्हावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या सूचनेनुसार संपूर्ण राज्यात सोमवारी (ता. ६) एलआयसी व स्टेट बँक ऑफ इंडिया कार्यालयासमोर केंद्रातील भाजपप्रणीत मोदी सरकारचा निषेध करीत जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.



विरार : वसई जिल्हा काँग्रेसतर्फे निदर्शने करण्यात आली.

वसई-विरार शहर जिल्हा काँग्रेसतर्फे जिल्हा काँग्रेसचे निरीक्षक सुरेश टावरे, प्रभारी जोजो थॉमस व प्रदेश सरचिटणीस विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वसई-विरार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ओनिल आल्मेडा यांच्या नेतृत्वात वसई माणिकपूर येथील एलआयसी कार्यालयासमोर; तर दुपारी १२ वाजता स्टेट बँक ऑफ इंडिया, पारनाका, वसई पश्चिम येथे जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. त्यानंतर वसई तहसीलदार यांच्या हस्ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना तसेच एलआयसी व स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे चेअरमन यांना निवेदने देण्यात आली.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष ओनिल अल्मेडा यांच्यासह मोहन घरत आणि नेप डायस, जिल्हा कार्यालय सरचिटणीस किरण शिंदे, माणिकपूर ब्लॉक अध्यक्ष विल्फ्रेड (विजू) डिसूजा, वसई ब्लॉक अध्यक्षा बिना फुर्ताडो, प्रदेश प्रतिनिधी आनंद चौबे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पाटील, युवा प्रदेश सहसचिव अंकिता वर्तक, सेवादल जिल्हाध्यक्ष रतन तिवारी, आलम अन्सारी, महिला तालुका अध्यक्षा छाया चोरघे, माहिती तंत्रज्ञान जिल्हाध्यक्ष रॉईस फरेल, रेशनिंग जिल्हाध्यक्ष नीलेश पगारे, सर्व ब्लॉक अध्यक्ष, सर्व सेलचे व फ्रंटलचे अध्यक्ष तसेच काँग्रेसचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

13) पुण्यनगरी पान क्र. 5

# हत्येच्या तीन महिन्यांनंतर फेकले होते शीर!

## श्रद्धा वालकर हत्याकांड न्यायालयात दाखल आरोपपत्रात नवी माहिती उजेडात

नवी दिल्ली : देशातील बहुचर्चित श्रद्धा वालकर हत्याकांड प्रकरणी पोलिसांनी सादर केलेले आरोप मंगळवारी दिल्लीतील न्यायालयाने दाखल करून घेतले. या आरोपपत्रानुसार आरोपी आफताब पूनावालाने श्रद्धाची हत्या केल्याच्या तीन महिन्यांनंतर तिचे शीर फेकले होते. त्यापूर्वी त्याने तिचा चेहरा आणि केस जाळून श्रद्धाची ओळख मिटवण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.

पोलिसांनी २४ जानेवारी रोजी ६,६२९ पानांचे आरोपपत्र दाखल केले होते. या आरोपपत्रात आफताबने श्रद्धाच्या हत्येची कबुली दिली आहे. आमच्यात किरकोळ कारणांवरून भांडणे व्हायची. हत्येच्या दिवशी म्हणजे १८ मे २०२२ रोजी आम्ही मुंबईला जाणार होतो. त्यासाठी विमानाची तिकिटे बुक केली होती. परंतु अचानक मी तिकिटे रद्द केली. यामुळे श्रद्धाने माझ्यासोबत वाद घातला. रागाच्या भरात मी तिचा गळा आवळून खून केला, असे



आफताबने सांगितले. श्रद्धाची हत्या केल्यानंतर आफताब तिचा मृतदेह बॅगमध्ये भरून फेकणार होता. त्यासाठी त्याने मोठी बॅगदेखील विकत घेतली होती. मात्र पकडले जाऊ या भीतीपोटी त्याने श्रद्धाच्या मृतदेहाचे तुकडे तुकडे करून त्यांची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्याने श्रद्धाच्या मृतदेहाचे ३५ तुकडे केले आणि एकेक करून ते जंगलात फेकले. आफताबने श्रद्धाचे शीर सर्वात शेवटी फेकले. त्यापूर्वी त्याने ब्लो टॉर्चने तिच्या डोक्यावरील केस जाळले आणि चेहरा विद्रुप केला. श्रद्धाचा चेहरा कोणी ओळखू नये म्हणून आफताबने हे कृत्य केले होते, असे आरोपपत्रात नमूद केले आहे. सुरुवातीला आफताबने श्रद्धाच्या हाडांची मिक्सर ग्राइंडरमध्ये पावडर करून ती रस्त्यावर फेकल्याचे सांगितले होते. मात्र ही माहिती तपास अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्यासाठी दिल्याचे आफताबने नंतर कबूल केल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपपत्रानुसार आफताबचे अनेक मुलींशी असलेले संबंध दोघांच्या भांडणाचे मुख्य कारण होते. दिल्ली, मुंबई आणि दुबईतील मुलींसोबत आफताबची मैत्री होती. श्रद्धाच्या हत्येनंतर आफताब तिचे सोशल मीडिया अकाउंट वापरत होता.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत

# तंबाखूचा साठा जप्त

नालासोपारा : महामार्गावर लाखोंचा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात मांडवी पोलिसांना यश आले आहे. सकवार गाव, मॅक्सेस हॉटेलच्या बाजूला पार्किंगमध्ये मांडवी पोलिसांना सोमवारी सकाळी एक संशयास्पद ट्रक आढळून आला. त्या ट्रकची तपासणी केली असता शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आला. पोलिसांनी केसरयुक्त विमल पानमसाला, सुगंधित मसाला, सुगंधित तंबाखू व ट्रक असा ५५ लाख ४० हजार ५१२ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, सहा आरोपींविरोधात मांडवी गुन्हा दाखल केला आहे.

Mumbai Main
Page No. 4 Feb 08, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-235 मुंबई, बुधवार 8 फरवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# क्राइम ब्रांच 3 के हत्थे चढ़ा महाठग



**वसई :** सस्ते रेट पर फ्लैट बेचने का झांसा देकर आम जनता से ठगी करने वाले मुख्य आरोपी को जेल हो गई है, यह कार्रवाई क्राइम ब्रांच 03 विरार की टीम ने की है। इनकी गिरफ्तारी से 5 अपराध (धोखाधड़ी) का खुलासा हुआ है। यह जानकारी पुलिस ने मंगलवार को दी है, पुलिस ने बताया कि 13/03/2021 से 06/07/2021 तक 69 वर्षीय हरेल पेंट्रिक सालवीन नाम के शिकायतकर्ता पर राम सिंह देवड़ा, शुभम मिश्रा, सूरज दुबे, गौतम चौधरी और रूम मालिक पुलक दास की मिलीभगत करके रूम नं.708, क्रिस्टल प्लाझो, यशवंत गौरव, नालासोपारा प. स्थित डीएचएफएल बैंक से बकाया कर्ज होने के बावजूद इस कमरे पर कोई कर्ज नहीं है, उक्त कमरे को निबंधन के माध्यम से बेचने का झांसा देकर और चेक के माध्यम से कमरे के लिए शिकायतकर्ता से कुल 17,50,000 रुपये चेक द्वारा ले लिया, उन्हें रूम का कब्जा न देकर और शिकायतकर्ता द्वारा रूम के लिए भुगतान किए गए पैसे वापस न करके धोखाधड़ी किया। तकनीकी विश्लेषण के आधार पर क्राइम ब्रांच 3 ने अपराध का मुख्य आरोपी रामसिंह जालमसिंह देवरा (28), को हिरासत में लिया जो सस्ते दर पर घर खरीदना चाहते थे और उनसे 50,00,000 रुपये की धोखाधड़ी की। यह कार्रवाई डीसीपी क्राइम अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 3 के पीआई प्रमोद बडाख की टीम ने की है।

Scanned with CamScanner

लोकमत

# दोन कोटींचा दंड भरा; नाही तर, लोक अदालतीला हजर व्हा!

## आता कडक कारवाई : ई-चलनाचा दंड भरण्यासाठी विशेष मोहीम

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वाहतूक नियमांचा भंग केल्याबद्दल वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आलेला दंड न भरल्यास आता कडक कारवाई होणार आहे. ई-चलनाचा दंड भरण्यासाठी विशेष मोहीम आयोजित केली असून, त्यानंतरही दंड न भरल्यास त्या वाहनचालकांवर थेट न्यायालयातून खटला दाखल होणार आहे.

आता वसईत दंड वसूल करण्यासाठी वसई न्यायालयातून नोटीस पाठवून लोक अदालतमध्ये हजर राहण्यास सांगितले जात आहे. त्यामुळे २१,६६३ वाहनचालकांना २,०९,७२,२०० रुपयांचा दंड न भरल्यास लोक अदालतमध्ये हजर व्हावे लागणार आहे.

आयुक्तालयात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर ई-चलन डिव्हाईस मशीनद्वारे पेड व अनपेड अशा दोन्ही स्वरूपात दंडात्मक कारवाई करण्यात येते. सध्या मात्र, अनेक वाहनचालकांकडून हा दंड भरण्यात आलेला नाही. ज्या वाहनचालकांचा दंड प्रलंबित आहे त्यांना आता लोक अदालतच्या नोटीसचे संदेश पाठविणे सुरू झाले आहे. तसेच जे वाहनचालक दंड भरणार नाहीत त्यांच्यावर न्यायालयात खटला दाखल होणार आहे. खटल्याचा निकालही लोक अदालतीमध्ये होणार आहे. तरी वाहनधारकांनी दंडाची रक्कम भरावी, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.



वसई आणि विरार वाहतूक शाखेने २०२२ मध्ये

**१,०७,२२२**

वाहनचालकांवर कारवाई

**५,६५,१८,७५०**

रुपयांचा लावला दंड

**२,०९,७२,२००**

रुपयांच्या दंडाची थकबाकी

### कुठे भराल दंड?

जवळची वाहतूक शाखा किंवा कोणताही वाहतूक पोलिस किंवा ऑनलाइन पद्धतीने प्रलंबित दंड भरावा. तसेच सर्वांनी महा ट्रॅफिक ॲप डाऊनलोड करून त्यांचे वाहन रजिस्टर करावे व त्यांच्या वाहनांवर प्रलंबित दंड असेल तर तो तातडीने भरावा.

### दंड न भरल्यास काय होणार?



ज्यांची दंडाची रक्कम भरणे बाकी आहे अशा वाहन चालकांना वसई न्यायालयातून नोटीस पाठवून लोक अदालतमध्ये हजर राहण्यास सांगितले जात आहे. जे वाहनचालक दंड किंवा लोक अदालतमध्ये सहभागी राहणार नाहीत अशा वाहनचालकांवर खटले भरण्यात येणार आहेत.

### रक्कम भरा, वाहतूक विभागाला प्रतिसाद द्या

जे दंड भरणार नाहीत किंवा लोक अदालतमध्ये सहभागी होणार नाहीत, अशा वाहनचालकांवर खटले भरण्यात येणार आहेत. त्यामुळे दंडाची रक्कम भरून वाहतूक विभागाच्या आवाहनाला प्रतिसाद द्या.

- विनोद जाधव,
सहायक पोलिस निरीक्षक,
वसई वाहतूक विभाग



Scanned with CamScanner

लोकमत

# दुचाकी, सायकलचोर टोळीचा पर्दाफाश करण्यात आले यश

## आचोळे पोलिसांची कामगिरी : पाच गुन्ह्यांची उकल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** आचोळे पोलिसांनी दुचाकी व सायकल चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. आरोपी सलाहुद्दीन खान, विपीन राय, जिशान खान आणि अविनाश वाल्मिकी यांना दुचाकी चोरीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून दोन दुचाकी आणि चार भंगार दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

अटक केलेले आरोपी दुचाकी चोरून भंगार विक्रेत्यांना विकायचे. अटक करण्यात आलेल्या आरोपींवर अनेक गुन्हे दाखल आहेत तसेच सायकल चोरी करणाऱ्या भरत वाघारी याला पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून १२ सायकल जप्त केल्या आहेत. आरोपी भरत वाघरी हा सायकल चोरून भंगार माफिया



आचोळे पोलिसांनी दुचाकी व सायकल चोरणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात यश मिळवले असून पकडलेल्या आरोपींसह पोलिस अधिकारी आणि कर्मचारी.

मोहसीन युनूस मलिकला विकायचा. त्यानंतर मोहसीन सायकलमध्ये फेरफार करून मोठ्या किमतीत विकायचा. पोलिसांनी ६ आरोपींना अटक करून लाखो रुपयांचा माल जप्त करत पाच गुन्ह्यांची उकल केल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

गालानगर भागात भरतकुमार पुरोहित (३५) यांनी बिल्डिंगसमोर दुचाकी उभी केली असता चोरट्याने दुचाकी चोरून नेली. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. वसई, नालासोपारा व आचोळे परिसरात दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात वाढ झाली.

गुन्हा उघडकीस आणण्यासाठ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली आचोळे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक यशपाल सूर्यवंशी, पोलिस उपनिरीक्षक सुहास म्हात्रे, राजेश काळपुंड, दत्तात्रय दैगडे, डी.एस पाटील, सतीश चव्हाण, विनायक कचरे आरोपींचा शोध सुरू केला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आचोळे पोलिसांनी गस्त व तपासात जुन्या दुचाकी व लहान मोठी वाहने चोरणाऱ्या आरोपींना अटक केली.





Scanned with CamScanner

लोकमत

# अतिवेगाची मस्ती भोवली; एक कोटी ८६ लाख रुपयांनी खिसा खाली!

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर गेल्या वर्षभरात ९,३०५ वाहनचालकांना केला दंड

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मुंबई - अहमदाबाद महामार्गावर वेगमर्यादेचे नियम डावलून वाहने धावत आहेत. त्यामुळे अनेकवेळा वाहनांवरील ताबा सुटून अपघात झाल्याच्या घटनादेखील घडलेल्या आहेत. या महामार्गावरून दररोज मुंबई ते गुजरात आणि गुजरात ते मुंबई अशी हजारो वाहने धावतात. महामार्गावरील वाहन हे मर्यादेपेक्षा जास्त वेगाने असेल तर, महामार्ग पोलिसांकडून स्पीडगनद्वारे त्या वाहनांचा नंबर व गती नोंद केली जाते. तसेच संबंधित वाहनधारकावर ऑनलाइन दंडात्मक कारवाई केली जाते. यामुळे महामार्गावर स्पीडगन दिसताच अनेक वाहनांची वेगमर्यादा कमी होते. महामार्गावर मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालवणाऱ्या ९३०५ चालकांकडून मिळून एक करोड ८६ लाख दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.



### एक किलोमीटरवरून वाहनांचा मोजला जातो वेग

महामार्गावर अतिवेगात असलेल्या वाहनांचा वेग एक किलोमीटर अंतरापर्यंत मोजला जातो. वेगमर्यादा ओलांडली असेल तर 'स्पीडगन'द्वारे त्या वाहनाचा व्हिडीओ आणि फोटो संपादित केले जातात. त्यानंतर ऑनलाइन चालान होते व आरसी नंबरवरून तो दंड आकारला जातो. दरम्यान, ही दंडाची रक्कम १५ दिवसांत भरण्यासंदर्भात संबंधिताला संदेश पाठवला जातो.

### वेग मर्यादेचे उल्लंघन; कोणत्या वाहनाला किती दंड?

दुचाकी- तीनचाकी
१,००० रु.

ट्रॅक्टर
१,५०० रु.

चारचाकी
२,००० रु.






### महामार्ग पोलिसांकडे एक स्पीडगन व्हॅन

वसई महामार्ग पोलिसांकडे एक स्पीडगन व्हॅन आहे. महामार्ग पोलिसांकडून दररोज कारवाई केली जात आहे. २०२२ मधील कालावधीत भरधाव व अतिवेगाने वाहने चालविणाऱ्या ९,३०५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून एक कोटी ८६ लाख दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

वरिष्ठांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शनाखाली महामार्गावरील भरधाव वेगातील वाहनांवर स्पीडगनच्या मदतीने वाहनांचा वेग रोखला जातो. जी वाहने ओव्हर स्पीडने वाहने चालवतात. त्यांना ऑनलाइन दोन हजारांचा दंड ठोठावण्यात येतो.

- विठ्ठल चिंतामण, पोलिस उपनिरीक्षक, महामार्ग पोलिस केंद्र, चिंचोटी

### रस्त्याच्या कडेला उभी केले जाते व्हॅन

चिंचोटी महामार्ग पोलिस केंद्रांची इन्टरसेप्टर वाहन इर्टिगा कार आहे. ती एखाद्या रोडच्या कडेला उभी केली जाते. या कारच्या पाठीमागे स्पीडगन मशीन आहे. त्यामशीनद्वारे वाहनांची वेगमर्यादा ऑटोमॅटिक कॅच केली जाते. मग त्या मशीनद्वारे वाहनांचा फोटो काढला जातो. या फोटोमध्ये वाहनावरील नंबर प्लेट स्कॅन केला जातो व दंड आकारण्यात येतो.

Hello Vasai
Page No. 4 Feb 08, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

चालकाचा मृत्यू झाल्याच्या घटनांत दिवसेंदिवस वाढ

# मोबाइलवर बोलताय? अपघाताचा धोका, दंडही लई मोठा!

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : 'अति घाई मरणाकडे नेई' किंवा 'नजर हटी दुर्घटना घटी' असे कितीही लिहिले तरी रस्त्यावर होणारे अपघात थांबत नाहीत. वाहन चालविताना मोबाईलवर बोलताना अपघात होऊन चालकाचा मृत्यू झाल्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. जीवाची पर्वा न करता मोबाईलवर सतत लागून राहणे हे अनेकांच्या जीवावर बेतले आहे.

मोबाईलवर बोलत असताना वाहन चालवू नये असे वाहतूक नियम असताना अनेकजण मोबाईलवर बोलून इतरांचा तसेच आपलाही बळी देतात. यावर नियंत्रणासाठी सुधारित मोटार वाहन कायद्यानुसार गाडी चालविताना मोबाईलवर बोलल्यास पहिल्या वेळी पकडले तर एक हजार रुपये आणि दुसऱ्या वेळी पकडले तर १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे.



**१० लाखांचा दंड वसूल**



वाहतूक विभागाच्या वसई, विरार विभागाने मागील वर्षभरात वाहन चालवताना मोबाईलवर बोलणाऱ्या ६०४ चालकांवर कारवाई केली आहे. त्यांच्याकडून १० लाख ३१ हजारांचा दंड वसूल केला आहे.

## मोबाइलवर बोलताना आढळाल तर जबर दंड



### लाइट मोटर व्हेईकल

मोबाइलवर बोलताना वाहन चालविल्यास दुचाकीस्वार आणि तीनचाकी चालकांना पहिल्यांदा एक हजार रुपये नंतर तोच दंड दहा हजार रुपये करण्यात येईल.

### इतर वाहने

वाहन चालवताना मोबाईलवर बोलताना आढळल्यास चारचाकी वाहनचालकाला पहिल्यांदा एक हजार रुपये नंतर तोच दंड दहा हजार रुपये करण्यात येईल.

वाहन चालवताना मोबाईलवर नाही बोलले, तर कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत नाही. जिवापेक्षा काहीही महत्त्वाचे नाही. त्यामुळे वाहन चालवताना मोबाइलवर बोलू नये. जर मोबाइल करणारा सारखाच फोन करीत असेल किंवा अत्यंत महत्त्वाचे असेल तर वाहन थांबवून बोलणे आवश्यक आहे.

\- सागर इंगोले, पोलिस निरीक्षक, वसई परिमंडळ-२, वाहतूक विभाग

## अपघाताची शक्यता वाढते

- मोटार वाहन कायद्याप्रमाणे वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे हा गंभीर गुन्हा आहे.
- वाहन चालवताना मोबाईलवर बोलणाऱ्या चालकांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे.
- मोबाईलवर बोलत असताना वाहन चालवणारे चालक स्वतःच्या बरोबरच अन्य प्रवाशांचाही जीव धोक्यात घालत असतात.





Scanned with CamScanner

लोकमत

# फसवणूक करणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

## पेल्हार पोलिसांची कामगिरी; १६ गुन्ह्यांची उकल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : बोलण्यात गुंतवून एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या चार आरोपींच्या आंतरराज्य टोळीला पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी पकडले आहे. या टोळीकडून १६ गुन्ह्यांची उकल करून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती गुरुवारी पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी दिली.

संतोष भवन येथे राहणारे हरिलाल यादव (४४) हे ९ डिसेंबरला आयसीआयसीआय बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. तेथे असलेल्या चार आरोपींनी गोंधळ घालून व बोलण्यात गुंतवून त्यांचे एटीएम कार्ड हातचलाखीने बदलून दुसऱ्या बँकेचे एटीएम दिले. त्यांचे एटीएम कार्ड घेऊन आरोपींनी त्यांच्या खात्यातून ४० हजार रुपये काढून फसवणूक केली. पेल्हार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. आयुक्तालयाच्या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून एटीएम सेंटरमधून पैसे काढून देण्याच्या बहाण्याने हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणारी टोळी सक्रिय झाल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली होती.

पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलिसांनी तांत्रिक माहितीवरून आरोपी निष्पन्न केले. परंतु, आरोपी वारंवार त्यांचे वास्तव्याचे ठिकाण बदलत होते. आरोपी कारने मध्य प्रदेशमार्गे महाराष्ट्रात येत असल्याबाबत गोपनीय माहिती पोलिस उपनिरीक्षक सनिल पाटील यांना मिळाली. त्यांनी ही माहिती शिरपूरचे पोलिस निरीक्षक शिरसाठ यांना देऊन त्यांच्या मदतीने आरोपी विकी पंडित साळवे (३२), विकी राजू वानखेडे (२२), अनिल कडोबा वेलदोडे (२१) आणि वैभव आत्माराम महाडिक (३४) यांना धुळ्यात पकडले. कोणाची अशा प्रकारे फसवणूक झाली असल्यास त्यांनी तत्काळ नजीकच्या पोलिस ठाण्यात तक्रार नोंद करावी, असे पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी सांगितले.



### ५ लाख २८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

आरोपींकडे वेगवेगळ्या बँकांचे एकूण १४ एटीएम कार्ड, गुन्ह्यात मिळालेल्या रकमेतून खरेदी केलेली कार, रोख ८९ हजार व वेगवेगळ्या कंपनींचे ३९ हजार रुपये किमतीचे मोबाइल फोन असा एकूण ५ लाख २८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.



Scanned with CamScanner

# विरार में पकड़ा गया 55 लाख रुपये का गुटखा

File Pic



■ **निसं, विरारः** मांडवी पुलिस और एफडीए की टीम ने मुंबई अहमदाबाद हाइवे स्थित सकवार गांव के पास छापा मार कर 55 लाख रुपये मूल्य का प्रतिबंधित गुटखा जब्त किया है। इस मामले में छह लोगों के खिलाफ केस दर्ज हुआ है। ठाणे एफडीए अधिकारी उत्तरेश्वर साहेबराव बडे को गुप्त सूचना मिली थी कि गुजरात से एक ट्रक में भारी मात्रा में प्रतिबंधित गुटखा मुंबई लाया जा रहा है। सूचना के बाद एफडीए टीम व पुलिस ने सकवार गांव के पास जाल बिछाया। मेक्सेस होटल में पार्क किया गया एक ट्रक की तलाशी ली, जिसमें गुटखा रखा हुआ था। इस मामले में पुलिस ने फैजान शेख़, प्रशांत अनिलकुमार सिंह, आसिफ गफ्फूर सैय्यद, रमेश कुमार मिश्रा, यतीश मिटकर व ट्रक चालक माधव थिगोटे के खिलाफ केस दर्ज किया है।

Scanned with CamScanner

# रेत माफिया पर कार्रवाई, 38 लोग अरेस्ट

**निसं, विरार:** मांडवी पुलिस ने अवैध रेती खनन करनेवालों के खिलाफ विशेष मुहिम चलाई है। पुलिस ने कसराली और वैतरणा खाड़ी पर रेती खनन करने वाले माफिया के खिलाफ बड़ी कार्रवाई करते हुए बोट, सेक्शन पंप समेत 35 लाख रुपये का माल जब्त किया है। मांडवी पुलिस ने अब तक 20 मामले दर्ज कर 38 लोगों को गिरफ्तार किया है। साथ ही दर्जनों बोट व 21सेक्शन पंप नष्ट किए गए हैं।

> मांडवी पुलिस ने कहा- अवैध खनन करनेवालों के खिलाफ कार्रवाई रहेगी जारी

## 35 लाख रुपये का माल जब्त

जानकारी के अनुसार, प्रशासन ने वैतरणा, खानीवडे, उसगांव, कन्हेर नारंगी समेत वसई विरार के खाड़ी किनारों में रेती खनन पर प्रतिबंध लगाया है। उसके बावजूद रेती माफिया रात के समय चोरी छिपे खनन कर रहे हैं। दो दिन पहले पुलिस ने कसराली और वैतरणा खाड़ी पर छापा मार कर सागर ज्ञानेश्वर पाटील और दिलीप काशीनाथ पाटील को गिरफ्तार कर केस दर्ज किया था। पुलिस ने खनन के दौरान इस्तेमाल होने वाली बोट व सेक्शन पंप को नष्ट कर दिया था। मांडवी पुलिस ने 20 मामले में 38 लोगों को गिरफ्तार किया है, जबकि 21 सेक्शन पंप नष्ट करते हुए 35 लाख रुपये का माल बरामद किया है। यह कार्रवाई पुलिस निरीक्षक प्रफुल्ल बाघ के मार्गदर्शन में की गई है।





Scanned with CamScanner